# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

## जाहिरात

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने वा महापालिकेविरुध्द भिवंडी तालुका न्यायालय, ठाणे जिल्हा न्यायालय, औद्योगिक न्यायालय, मुंबई उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात विविध दावे, याचिका दाखल होत असतात या प्रकरणात महापालिकेची बाजू मांडण्याकरिता महापालिकेच्या वकिल पॅनलवर नियुक्ती करणे करिता खालील नमुद केलेल्या अटी व अर्हता पूर्ण करणा-या इच्छुक वकिल उमेदवारांकडून जाहिरात दिनांकापासून ७ (सात) दिवसांत म्हणजे दि.२४/०६/२०१७ रोजी पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

**अ) मा. सर्वोच्च न्यायालया करिता वकिल पॅनलकरिता-**

सर्वोच्च न्यायालयात याचिकांचे काम चालविण्याचा किमान १० वर्षे अनुभव असलेल्या वकिल व्यवसायी. कर विषय कायदे, स्थानिक स्वराज्य स्वस्थां संबंधीचे कायदे, लवाद कायदा, कामगार विषयक कायदे इत्यादी मध्ये तज्ज्ञ असलेल्यास प्राधान्य दिले जाईल.

**ब) मुंबई उच्च न्यायालया करिता वकिल पॅनलकरिता-**

१) उमेदवार हा किमान मान्याताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर.
२) उमेदवार हा महाराष्ट्र राज्य बार कॉन्सिलचा सनद धारक आणि किमान ५ वर्षे वकिल म्हणुन व्यवसायी अनुभव असलेला असावा.
३) उमेदवार हा दिवाणी व फौजदारी उच्च न्यायालयातील प्रकरणे हाताळण्याचा व न्यायालयाच्या कार्यपध्दतीचे उत्तम ज्ञान व अनुभव असलेला.
४) कर विषयक कायदे, स्थानिक स्वराज्य संस्थां विषयीच्या कायद्यांचे, लवाद कायदा, कामगारविषयक कायदे, दिवाणी व फौजदारी कायदे, महापालिका संबंधीचे न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याचा उत्तम ज्ञान व अनुभव असलेला असणे आवश्यक आहे.

**क) मुंबई उच्चन्यायालया करिता सिनियर कॉन्सील पॅनल करिता-**

१) मुंबई उच्चन्यायालयात सिनिअर कॉन्सील काम पाहणारे आणि विशेषतः महापालिका संबंधीचे प्रकरणे हाताळणे कायदे तज्ज्ञ असणे आवश्यक आहे.

**ड) जिल्हा न्यायालय ठाणे करिता वकिल पॅनल करिता-**

१) महापालिकेच्या वतीने वा विरुध्द दाखल होणारी अपिले, विशेष दिवाणी दावे, फौजदारी प्रकरणे हाताळणेचा ५ वर्षे अनुभव असलेला वकिल व्यवसायी.

**इ) औद्यौगिक न्यायालय ठाणे करिता वकिल पॅनल-**

१) औद्यौगिक न्यायालयातील प्रकरणे हाताळण्याचा १० वर्षाचा अनुभव असलेला वकिल व्यवसायी.
२) कामगार विषयक कायद्याचे व औद्यौगिक न्यायालयीन कार्यपध्दतीचे उत्तम ज्ञान व अनुभव असलेला वकिल व्यवसायी.

**ई) भिवंडी तालुका न्यायालया करिता वकिल पॅनल करिता-**

१) भिवंडी तालुका न्यायालयातील फौजदारी व दिवाणी दावे हाताळण्याचा किमान ५ वर्षे उत्तम अनुभव व ज्ञान असलेला वकिल व्यवसायी.

विशेषतः महापालिका संबंधीचे कायदे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणेचा अनुभव असलेले व अन्य महापालिका वकिल पॅनलवर काम केल्याचा अनुभव असलेला, विधी पदव्युत्तर अभ्यासक्रम-एल.एल.एम. शैक्षणीक अहर्ता असलेला वकिल व्यवसायास प्राधान्य दिले जाईल. इच्छुक उमेदवारांनी अर्जा सोबत व्यवसायीक अनुभवासंबंधी स्वःघोषणा पत्र जोडणे आवश्यक आहे. सदर अर्ज हे nsachivbncmc@gmail.com या ई-मेल वर, पोस्टाने वा प्रत्यक्ष महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील बारनिशी विभागात स्विकारले जातील.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वकिल पॅनलवर कोणत्याही उमेदवाराची नियुक्ती करणेचे व नियुक्ती नाकरणेचे अधिकार वा नियुक्ती प्रक्रियेत बदल करणेचे सर्व अधिकार महानगरपालिका आयुक्तांना राहतील. याबाबत कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

सही/- XXX

**(डॉ. योगेश म्हसे, भा.प्र.से.)**

**भिवंडी नि. शहर महानगरपालिका, भिवंडी.**